# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 16.10.2024** **वार – बुधवार**

---

**निवडणूक-पुणे**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, निर्भय वातावरणात आणि सुलभ, सहजतेनं पार पाडण्यासाठी निवडणूक प्रशासन सज्ज असून राजकीय पक्षांनीही निवडणूक यंत्रणेला सहकार्य करावं, असं आवाहन पुणे जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉक्टर सुहास दिवसे यांनी काल केलं. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानं जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित राजकीय पक्षांच्या बैठकीत ते बोलत होते. आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. निवडणुकीची अधिसूचना 22 ऑक्टोबरला प्रकाशित होणार असून अर्ज दाखल करण्याचा अखेरचा दिवस 29 ऑक्टोबर राहील. 30 ऑक्टोबरला छाननी आणि 4 नोव्हेंबर हा उमेदवारी मागे घेण्याचा अंतिम दिनांक आहे. मतदान 20 नोव्हेंबर तर मतमोजणी 23 नोव्हेंबरला होणार आहे.

**केंद्रीय-मंडळ**

भारताच्या औद्योगिक क्षेत्रात विविध शहरांमध्ये परकीय देश गुंतवणूक करीत असल्यानं अनेक सुशिक्षित तरुणांना रोजगार मिळत आहे. भारतीय अर्थव्यवस्था अधिक भक्कम होऊन विविध मापदंडांवर खरी उतरली आहे, ती जगातील एक खात्रीलायक अर्थव्यवस्था बनेल असा विश्वास भारतीय रिझर्व बँकेच्या केंद्रीय मंडळाचे संचालक सतीश मराठे यांनी आज पुण्यात व्यक्त केला. चिंचवड इथल्या प्रतिभा व्यवसाय व्यवस्थापन संस्थेतील विद्यार्थ्यांना भारतीय अर्थव्यवस्था आणि बँकिंग क्षेत्रातील सद्यस्थिती या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

**संकलन**

राज्याचा नोंदणी आणि मुद्रांक विभाग आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचा कर संकलन विभाग यांची संगणक प्रणाली एकात्मिक झाली आहे. आता मालमत्ता खरेदी-विक्रीबाबतच्या दस्तांबाबत अद्ययावत माहिती थेट उपलब्ध होत आहे. यामुळं अर्ज न करता मालमत्ता हस्तांतरण प्रक्रिया करता येणार आहे.

**जागृती**

विज्ञान भारती आणि इस्त्रो संस्थेच्या वतीनं विद्यार्थ्यामधील वैज्ञानिक जागृती करण्यासाठी एका व्हॅनमध्ये प्रयोगशाळा विकसित करण्यात आली आहे. यामध्ये 17 ते 27 ऑक्टोबर या कालावधीत विविध प्रयोग विद्यार्थ्यांना दाखविले जाणार आहेत अशी माहिती विज्ञान भारतीचे अध्यक्ष डॉक्टर शेखर मांडे यांनी पुण्यात दिली. विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा, विज्ञान प्रतिकृती, पत्रक स्पर्धा, विज्ञान रांगोळी, अंतराळ संशोधनाची माहिती यात दिली जाणार आहे.

**वाचन**

पुण्यातील बालक पालक फाऊंडेशनच्या वतीनं वाचन साखळी प्रकल्पाच्या अंतर्गत राज्यातील ग्रामीण आणि निमशहरीभागातील विद्यार्थांपर्यत टपालाद्वारे घरपोच विनामूल्य पुस्तकं पोहोचवली जात आहेत. वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्तानं या प्रकल्पांतर्गत पुणे, कोल्हापूर, बीड, सोलापूर, जळगाव आणि सांगली जिल्हयातील सुमारे नऊ तालुक्यात पुस्तकांचे 30 संच मुलांना घरपोहोच रवाना झाले आहेत, अशी माहिती फांऊडेशनचे अध्यक्ष विनायक जोशी यांनी दिली.

**शिष्यवृत्ती**

पुणे महापालिका हद्दीत राहणाऱ्या इयत्ता 10 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक अर्थसाहाय्य योजनेअंतर्गत आणि इयत्ता १२वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शैक्षणिक अर्थसाहाय्य योजनेत 12 हजार 889 अर्ज आले आहेत. या योजनेअंतर्गत इयत्ता दहावीमध्ये 80 टक्केपेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रत्येकी पंधरा हजार रुपये तर बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी 25 हजार रुपयांचं अनुदान देण्यात येतं.

**बंदीश**

गुणीजान रिसर्च आर्ट कल्चर अँड एज्युकेशन फाऊंडेशनतर्फे पुण्यात आयोजित गुणीजान बंदिश स्पर्धेच्या स्त्री विभागातून उपांत्यपूर्व फेरीत पोहोचलेल्या 11 स्पर्धकांच्या नावांची आज घोषणा करण्यात आली. यातून सहा स्पर्धकांची अंतिम फेरीसाठी निवड केली जाणार आहे. हिंदुस्थानी शास्त्रीय गायक पंडित सी. आर. व्यास यांच्या शताब्दीनिमित्त देशपातळीवर गुणीजान बंदिश स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. या स्पर्धेची उपांत्य आणि अंतिम फेरी 19 ऑक्टोबरला पुण्यात होणार आहे.

**पाणी**

पुणे महापालिकेच्या पर्वती, लष्कर, एसएनडीटी, वडगाव, वारजे आणि नवीन होळकर पंप या पाणी पुरवठा केंद्रावर करायच्या दुरुस्तीच्या कामामुळं उद्या गुरुवारी संपूर्ण पुणे शहराचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. शुक्रवारी सकाळी उशिरा आणि कमी दाबानं पाणी पुरवठा होईल असं महापालिकेतर्फे कळवण्यात आलं आहे.तसंच पिंपरी चिंचवड शहराचा पाणी पुरवठा उद्या संध्याकाळी बंद राहणार आहे.

**रेल्वे**

मध्य रेल्वेनं दिवाळीनिमित्त लातूर-हडपसर-लातूर ही विशेष रेल्वे गाडी सोडण्याचा निर्णय घेतला आहे. ही गाडी 25 ऑक्टोबर ते 11 नोव्हेंबर दरम्यान आठवड्यातील चार दिवस सोडण्यात येणार आहे.

**बचतगट**

पुणे महापालिकेतर्फे शेजार समूह गट आणि बचत गटांतील महिलांनी उत्पादित केलेल्या वस्तुंचं 'दिवाळी बचत बाजार प्रदर्शन आणि विक्री उपक्रम' 24 ते 27 ऑक्टोबर दरम्यान सकाळी 11 ते रात्री नऊ या वेळेत होणार आहे. पुणे महापालिकेच्या समाज विकास विभागाचे प्रमुख नितीन उदास यांनी आज पत्रकारांना ही माहिती दिली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**